# <u>जाहीर लिलाव</u>

**अन्नशास्त्र व तंत्रज्ञान विभाग,महात्मा फुले कृषि विदयापीठ, राहुरी** या कार्यालयाकडील विविध जुने व निरुपयोगी जडवस्तू साहीत्याची जाहीर तोंडी लिलाव पध्दतीने दिनांक - **२२/०६/२०२२** वेळ **सकाळी १०.०० वाजता** विक्रि करावयाची आहे.

**ठिकाण :- अन्नशास्त्र व तंत्रज्ञान विभाग, महात्मा फुले कृषि विदयापीठ, राहुरी**

जाहीर तोंडी लिलावा बाबतच्या अटी व नियम आणि लिलाव करावयाच्या वस्तु **अन्नशास्त्र व तंत्रज्ञान विभाग, मफुकृवि,राहुरी या विभागाच्या बेकरी युनिटमध्ये** कार्यालयीन वेळेत दिनांक **१४/०६/२०२२** पासून पाहण्यास मिळतील.

**अध्यक्ष,**
लिलाव समिती तथा,
**प्रमुख,**
अन्नशास्त्र व तंत्रज्ञान विभाग
मफुकृवि,राहुरी

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
महात्मा फुले कृषि विदयापीठ,राहुरी
कार्यालय :अन्नशास्त्र व तंत्रज्ञान विभाग मफुकृवि,राहुरी
ता.राहुरी, जिल्हा अहमदनगर पिन-४१३७२२
ईमेल - hodfst.mpkv@gov.in/fstmpkv@gmil.com Ph.No.02426 , 243259

## " जाहीर तोंडी लिलावा बाबतच्या अटी व नियम"

१. जाहीर तोंडी लिलावामध्ये भाग घेणा-यास लिलावाच्या अगोदर अनामत रक्कम म्हणून रु.५,००० /- ( पाच हजार रुपये मात्र) रोख स्वरुपात सकाळी १०.०० वाजेपर्यत जमा करणे आवश्यक राहील. रोख रक्कमेसोबत संपुर्ण नाव , पत्ता व मोबाईल नंबर लिहिलेले पाकीट देणे आवश्यक आहे त्याशिवाय जाहीर तोंडी लिलावामध्ये भाग घेता येणार नाही.

२. या कार्यालयाकडील साहित्यांचा जाहीर तोंडी लिलाव वस्तूंचे गट (लॉट) करुन त्यांना लॉट नंबर देण्यात येतील. त्यानुसार आपणास लिलावाची तोंडी बोली लावायची आहे.

३. लिलाव झाल्यानंतर ज्या लिलाव धारकाने लिलाव घेतला असेल त्यांनी विकत घेतलेल्या मालाची संपुर्ण किंमत लिलावाच्याच दिवशी भरणे बंधनकारक राहील. (**UPI/ NEFT/ RTGS व अपवादात्मक परिस्थितीत रोखीने स्वीकारले जातील.** ) तसेच लिलाव घेतलेल्या गटातील माल ताबडतोब उचलण्याची व्यवस्था करावी लागेल. संपुर्ण माल ताबडतोब उचलणे शक्य नसल्यास दोन दिवसाच्या आत संपुर्ण माल उचलावाच लागेल. दोन दिवसात सदर माल उचलला नाही तर त्या मालावरील आपला हक्क रदद् समजण्यात येवून आपण भरलेली अनामत व लिलावाची रक्कम जप्त करण्यात येईल व सदर लॉटचा लिलाव रदद् करण्यात येईल या बाबत मा. अध्यक्षांचा निर्णय अंतिम राहील.

४. जाहीर तोंडी लिलावामध्ये भाग घेणा-याने लिलावातील वस्तू खरेदी केल्यानंतर सदरच्या वस्तू उचलण्याची व सांभाळण्याची संपुर्ण जबाबदारी संबंधीत लिलाव धारकावर राहील त्याबाबत कुठल्याही प्रकारची तक्रार चालणार नाही.

५. जाहीर तोंडी लिलावात येणारी किंमत किंवा किंमती बाबतची तडजोड किंवा कोणत्याही वादा बाबतचा अंतिम निर्णय देण्याची अथवा सदर मालाच्या गटाचा लिलाव पूर्ण रदद् करण्याचा हक्क मा. अध्यक्षांनी राखून ठेवलेला आहे.

६. लिलावात बेकायदेशीर कृत्य आढळून आल्यास अशा व्यक्तिंची अनामत रक्कम जप्त करण्यात येईल व त्यापुढील लिलावात त्यांना भाग घेता येत नाही.

७. सदरच्या जाहीर तोंडी लिलावामध्ये होणारा व्यवहार राहुरी न्यायालयीन कक्षेत राहील.

८. जाहीर तोंडी लिलावाची बोली रुपये ५००/- च्या पटीत बोलावी लागेल.

९.कोरोना महामारीचा संसर्ग रोखण्याच्या दृष्टीने ज्या व्यक्तींनी अनामत रक्कम जमा केली असेल त्याच व्यक्तिंना लिलावाच्या ठिकाणी प्रवेश दिला जाईल इतर कोणालाही प्रवेश दिला जाणार नाही.

१०. लिलावात भाग घेणा-या सर्वाना कोरोना नियमांचे पालन करणे बंधनकारक राहील.

११. विक्रि मुल्यावर नियमानुसारस सेवा व वस्तुकर GST / IT भरण्याची जबाबदारी खरेदी दाराची राहील. तसेच खरेदी दारास खरेदी रक्कमेवर नियमानुसार सर्वप्रकारचे कर व शुल्क भरणे आवश्यक राहील त्यातून कोणत्याही प्रकारची सुट मिळण्याचे प्रमाणपत्र खरेदीदारास मिळणार नाही.

१२. बेकरी युनिट मधुन बेकरी मधील मशिनरी बेकरीचे कोणत्याही प्रकारचे नुकसान न होता मशिन सोबत जोडण्यात आलेले पाईप मशिन पासुन वेगळे करण्याची सर्वस्वी जबाबदारी लिलाव धारकाची राहील.

अध्यक्ष,
लिलाव समिती तथा,
प्रमुख,
अन्नशास्त्र व तंत्रज्ञान विभाग
मफुकृवि,राहुरी